REGISTERED No. B. 3431

**दी बँक ऑफ औंध, लिमिटेड.**

हेड ऑफिसः—१११।११२ सदाशिव पेठ, सातारा

शाखाः—औन्ध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.

मुंबई, पुणें, सांगली, सोलापूर, कऱ्हाड वगैरे

★ ठिकाणांवर ड्राफ्टस् दिले जातात.

**बचतीच्या आकर्षक योजना**

★ मुदत ठेवी आकर्षक दरानें १ ते ५ वर्षे पर्यंत स्वीकारल्या जातात.

★ सेव्हिंग बँकेत रु. १५,०००/– पर्यंत ठेव ठेवतां येते. खात्यांतून आठवड्यांतून दोनदा चेकनें रकमा काढतां येतात. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.

वा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख २८ सप्टेंबर, १९४९ | अंक ३९

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ४१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४३,००,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर

## सारस्वत

## को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[ स्थापना १९१८ ]



सारस्वत बँक बिल्डिंग, मुंबई ४ — टे. नं. ३१६७५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ४,२५,६०० |
| रिझर्व्ह | ... | रु. २,६५,३०० |
| ठेवी | ... | रु. ८९,५२,५०० |
| खेळतें भांडवल | ... | रु. ९७,५४,७०० |

बचतीच्या आकर्षक योजना

सब–ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

वा. पु. वर्दे, बी. कॉम्., अध्यक्ष.

शं. वि. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी.

बेळगांव शाखा : मार्केट, बेळगांव

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.




तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

## सोसायट्यांस विनंति

किर्लोस्कर कंपनी सोसायट्यांना ज्या भावांत माल देते त्याच भावांत आम्हींहि नांगर वगैरे माल पुरवितों. आपली कोणतीहि ऑर्डर आपण आमचे मार्फत पाठविण्यानें तोटा नसून फायदाच आहे. सर्व तऱ्हेची सोसायट्यांना लागणारी माहिती व इतरहि माल आम्ही पुरवितों.

**या वर्षीची ऑर्डर आमचे मार्फतच पाठवा.**

**केळकर बंधु, पुणें व नाशिक.**


## विविध माहिती

**हैद्राबाद संस्थानांत प्राचीन नाणीं**—हैद्राबाद संस्थानच्या पुराण वस्तु संशोधन खात्याला कोंडापूर येथें ख्रिस्ती शकापूर्वीच्या २ ऱ्या शतकांतील कांहीं जुनी नाणीं सांपडलीं आहेत. हीं नाणीं आंध्र आणि महिष राज्यकर्त्यांचीं आहेत. आतांपर्यंत ४,००० नाणीं आणि कांहीं मातीची भांडीं, मणी, इत्यादी जिनसा सांपडल्या आहेत.

**अजंठा लेण्यांचें संरक्षण**—हैद्राबादच्या सरकारनें अजंठा व वेरूळ येथील सुप्रसिद्ध लेण्यांच्या रक्षणासाठी ९ लाखांची रक्कम तज्ज्ञांच्या कमिटीच्या शिफारसीप्रमाणें मंजूर केली आहे. रकमेपैकीं ४ लाख रुपयांची रक्कम एकदम मिळणार असून नंतर दरवर्षी १ लाख रुपये पांच वर्षेपर्यंत मिळणार आहेत.

**हिंदी अनुबोध चित्रपट**—एडिंबरो येथें भरविण्यांत आलेल्या अनुबोध चित्रपटांच्या प्रदर्शनांत हिंदी चित्रपटांचें बरेंच कौतुक करण्यांत आलें असें समजतें. प्रदर्शनांत एकूण सात हिंदी अनुबोधपट दाखविण्यांत आले. त्यापैकीं दोन चित्रपट हिंदी नृत्यांची माहिती करून देणारे होते. सध्यां ब्रिटनमध्यें हिंदी नृत्यकलेविषयीं बरेंच औत्सुक्य निर्माण झालें आहे.

**रशिआची गेल्या वीस वर्षांतील प्रगति**—सोव्हिएट रशिआच्या पंचवार्षिक योजनांचे माजी सल्लागार डॉ. ट्रोन ह्यांचें दिल्ली येथें एक व्याख्यान झालें. रशिआंतील दर डोई उत्पादन पुढारलेल्या बऱ्याच देशांच्या मानानें आजही कमी असलें तरी रशिअन कामगारांनीं गेल्या वीस वर्षांत जी प्रगति करून दाखविली ती तितक्याच काळांत इतर कोठेंहि होऊं शकली नाहीं, असा अभिप्राय डॉ. ट्रोन ह्यांनीं व्यक्त केला.

**हिंदुस्थानांतील रेडिओचे कारखाने**—आतापर्यंत हिंदुस्थानांत रेडिओचे ४ कारखानें निघाले आहेत. त्यांपैकीं दोन मुंबईंत आहेत. मुंबईंत मर्फी रेडिओ ऑफ इंडिआ ह्या नांवाची कंपनी नुकतीच निघाली आहे. ह्या कारखान्यांत दरवर्षी १५,००० रेडिओ सेट्स तयार होतील. कारखाना थोडा वाढविला तर तिची निर्मिती २०,००० सेट्सपर्यंत जाऊं शकेल.

**साखर व्यापाऱ्यांची मागणी**—इंडिअन शुगर सिंडिकेटला सरकारनें दिलेली मान्यता काढून घ्यावी अशी मागणी संयुक्त प्रांताच्या साखर व्यापाऱ्यांनीं केली आहे. सरकारी संस्थामार्फत साखर वांटप करून सरकार साखरेच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करीत आहे ह्याबद्दल व्यापाऱ्यांनीं सरकारचा निषेध करणारा ठराव मंजूर केला आहे.

**अखिल भारतीय आर्थिक परिषद्**—अखिल भारतीय आर्थिक परिषदेचें चालू वर्षाचें अधिवेशन आंध्र विद्यापीठातर्फे वाल्टेर येथें डिसेंबर १९४९ मध्यें भरविण्यांत येणार आहे. डॉ. व्ही. के. आर व्ही. राव हे अध्यक्ष म्हणून काम करणार आहेत.

**ब्रिटिश पार्लमेंटला देणगी**—ब्रिटिश पार्लमेंटच्या नव्या सभागृहासाठीं ओक वृक्षाच्या लाकडाचा एक दरवाजा हिंदुस्थानतर्फे देणगी म्हणून देण्यांत येणार आहे. ह्या दरवाजाचें सर्व काम ब्रिटनमध्येंच करण्यांत येणार असून त्याचा खर्च हिंदुस्थान सोसणार आहे. ब्रिटिश कॉमनवेल्थ मधील इतर राष्ट्रेंही ब्रिटिश पार्लमेंटला आपआपल्या देशातर्फे कांहीं देणग्या देणार आहेत.

**युगोस्लाव्हिआला कर्ज मिळालें**—युगोस्लाव्हिआला दोन कोटी डॉलर्स कर्ज एक्सपोर्ट-इम्पोर्ट बँकेतर्फे मंजूर करण्यांत आल्याचें अमेरिकेनें अधिकृत रीत्या जाहीर केलें आहे. हैफामधील बंदराची सुधारणा करण्यासाठीं २३,५०,००० डॉलर्सचें कर्ज पॅलेस्टाइनमधील ज्यू सरकारलाही मंजूर करण्यांत आलें आहे.

**मद्रास प्रांतांतील वीज-कंपन्या**—मद्रास सरकारनें विजेचा पुरवठा करणाऱ्या प्रांतांतील पांच कंपन्या आपल्या ताब्यांत घेतल्याचें जाहीर केलें आहे. ह्या पांच कंपन्यांत ३ कंपन्या युरोपिअन भांडवलाच्या मालकीच्या आहेत.

**रशिआंतील आर्थिक पुनर्घटना**—कँटरबरीचे डीन डॉ. ह्यूलेट जॉन्सन हे मास्को येथील शांतता परिषदेहून परत आले. राशिआंतील जनतेला शांततेची फार इच्छा असून, रशिआंत शांतताकालीन पुनर्घटनेचीं कामें फार वेगानें चालू आहेत अशी माहिती त्यांनीं प्राग येथें बोलतांना सांगितली.

**रेल्वेवर रेडिओनें दळणवळण**—आगगाडीचें एंजिन आणि गार्डाचा डबा ह्यांच्यांत रेडिओनें दळणवळण ठेवण्याचे प्रयोग सध्या बी. बी. अँड सी. आय्. रेल्वेवर करण्यांत येत आहेत. त्याचप्रमाणें, रेल्वे स्टेशनांवरही रेडिओचा उपयोग करण्याच्या शक्यतेचा विचार चालू आहे. गाड्या जोडण्याच्या कामीं यार्डांत रेडीओचा संदेशवाहनासाठी उपयोग करता आला तर वेळेची फार मोठी बचत होण्यासारखी आहे.

**उद्योगविनिमयाच्या खर्चांत कपात**—हिंदुस्थान सरकारच्या कपात करण्याच्या धोरणास अनुसरून देशांतील उद्योग विनिमय केंद्रांच्या खर्चांत ३३% कपात करण्यांत येणार आहे असें समजतें. ह्या काटकसरीमुळें ४८ लाख रुपयांची बचत होणार आहे. ह्या केंद्रांचा १९४९-५० सालांतील खर्चाचा अंदाज १,४८,००,००० रुपये करण्यांत आला होता. बचत करण्याचे तीन मार्ग सुचविण्यांत आलेले आहेत: (१) केंद्रांच्या अधिकाऱ्यांचे दौरे कमींत कमी करणें, (२) प्रांतिक सरकारांकडून जे अधिकारी मध्यवर्ती सरकारनें तात्पुरते आपल्याकडे मागून घेतले होते, त्यांना परत प्रांतांकडे पाठविणें, आणि (३) रिकाम्या झालेल्या जागांवर नवीन भरती न करणें. ह्या मार्गांनीं नोकरीवरून कमी कराव्या लागणाऱ्या लोकांची संख्या फारशी मोठी होणार नाहीं.

**तांदूळ न खाणाऱ्यांना तो मिळणार नाहीं**—ज्या भागांतील लोकांचें मुख्य अन्न तांदूळ हें नाहीं, तेथील लोकांना पुढील खरीप हंगामापासून तांदुळाच्या शिध्याचा पुरवठा करण्यांत येणार नाहीं असें समजतें. पुढील वर्षी तांदुळाची आयात कमी करून, ज्या प्रांतांत गरजेपेक्षा अधिक तांदूळ पिकतो त्यांच्याकडून हल्लीपेक्षा अधिक प्रमाणांत त्याची वसुली करण्यांत येणार आहे. अशा प्रांतांत मध्यप्रांत, वऱ्हाड, कूर्ग, ओरिसा आणि विंध्यप्रदेश ह्यांचा समावेश होतो. चालू वर्षांत १०,४०,००० टन तांदुळाचें वांटप करण्यांत यावयाचें आहे. त्यापैकीं त्रावणकोर-कोचीन संघराज्याला ३,२०,००० टन, मुंबईला २,००,००० टन, मद्रासला १,२५,००० टन आणि प. बंगालला ८,५०,००० टन अशी वांटणी व्हावयाची आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १८ सप्टेंबर, १९४९





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## आंतरराष्ट्रीय व्यापाराची घडी

### चलनविषयक उपाययोजनेची मर्यादित उपयुक्तता

पौंडाची किंमत उतरविण्यांत आली, त्याचे पाठोपाठ हिंदी रुपयाची किंमतहि कमी करण्यांत आल्याचें प्रसिद्धच आहे. पूर्वी १ रु. = ३०.२२५० सेंट असा दर होता; तो आतां १ रु. = २१ सेंट असा झाला आहे. ह्या नव्या भावास इं. मो. फंडानें अर्थातच मान्यता दिली आहे. केवळ चलनाची किंमत उतरविल्यानें आयात–निर्गतीचा प्रश्न सुटूं शकत नाहीं, हें उघड आहे उत्पादन कमी किंमतीस कार्यक्षमतेनें करणें, त्याचा परदेशांत उठाव करणें, अंतर्गत किंमती खाली आणणें, सरकारी व इतर खर्चांत काटकसर करणें, सारांश, प्रत्येक बाबीकडें डोळ्यांत तेल घालून पाहून आपला राष्ट्रीय आर्थिक संसार किफायतशीर करणें, ह्यावरच चलनी उपाययोजनेचें यश अवलंबून रहाणार आहे. सरकारास लष्करी खर्चांत फारशी बचत करता आली नाहीं, तरी इतर अनवश्यक खर्चास छाट देणें अगदी शक्य आहे. देशांतील सबंध आर्थिक यंत्र किती कार्यक्षमतेनें कामास लावण्यांत येतें, हीच येथें महत्त्वाची गोष्ट आहे.

### पाकिस्तान व हिंदुस्थान

चलनविषयक सध्याच्या घडामोडींत, पाकिस्ताननें आखलेलें स्वतंत्र धोरण, हा एक चर्चेचा विषय झाला आहे. पाकिस्ताननें आपल्या चलनाची किंमत उतरविली नाहीं, त्यामुळें ब्रिटिश माल पाकिस्तानांत पूर्वीपेक्षा स्वस्त दरानें मिळूं लागेल. सहाजीकच, ब्रिटिश मालाची पाकिस्तानाकडे निर्गत वाढेल. यंत्रसामुग्रीसारखा भांडवली माल अशा रीतीनें सुलभतेनें मिळविण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न आहे. डॉलर गटांतून येणारा माल पाकिस्तानला सध्यापेक्षा ज्यास्त महाग पडणार नाहीं. पाकिस्तान ज्या कच्च्या मालाची निर्गत करतो, त्या मालास जागतिक मागणी आज तरी पुरेशी असल्यानें ह्या परिस्थितीचा तात्कालिक फायदा पाकिस्तान घेऊं पहात आहे. पाकिस्तानाची १६ कोटी पौंडांची इंग्लंडमध्यें गंगाजळी अडकून आहे, तिची किंमत कमी झाली तरी प्रत्यक्ष किती रक्कम सालोसाल गंगाजळींतून मिळेल, तेवढ्यावरच तो परिणाम होईल. परंतु, इकडे निर्गत मालास त्यामानानें अधिक किंमत येईल असा पाकिस्तानचा हिशेब आहे. कपास, ताग, लाकूड, चहा, कातडी, इत्यादींच्या निर्गतविरील जकातीची पट्टी उतरवून निर्गतीस प्रोत्साहन देण्याचा पाकिस्तानाचा विचार आहे. चैनीच्या वस्तूंवरील आयातपट्टी वाढवून, जकातींच्या उत्पन्नांतील तूट भरून काढण्यांत येईल. हिंदी गिरण्यांत वापरण्यांत येणाऱ्या पाकिस्तानी कपाशीऐवजी इजिप्तची व पूर्व आफ्रिकेची कपास घेण्याची भाषा मुंबईमध्यें बोलली जात आहे. त्याचप्रमाणें, पाकिस्तानी कच्च्या तागाची किंमत योग्य पातळीवर आल्याखेरीज त्याची खरेदी न करण्याचें हिंदी व इंग्रज हितसंबंधीयांनीं ठरविलें आहे. पाकिस्तानाला त्याच्या रुपयाची सध्याची किंमत टिकवितां येणार नाहीं; थोड्याच अवधींत त्याला ती उतरवावी लागेल असें कित्येक हिंदी तज्ज्ञांचें मत आहे. परंतु, पाकिस्तान आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण नसल्यानें तो टिकणार नाहीं असें भाकीतहि फाळणीचे वेळीं कित्येक तज्ज्ञांनीं केलें होतें. कपास आणि ताग ह्या बाबतींत हिंदुस्थानास पाकिस्तानाचा निर्णय कांहीं काळ तरी बाधक होणार आहे. पाकिस्तान हा स्वतःचे पायावर उभा राहूं शकतो; पौंडा-बरोबर पाकिस्तानी रुपयानेंहि डळमळण्याचें कारण नाहीं, असें दाखविण्याचें पाकिस्तानचें धोरण असावें. म्हणजे, त्यांत आर्थिक बरोबर इतरहि हेतु असण्याचा संभव आहे. पाकिस्तानच्या ह्या निर्णयानें हिंदुस्थानाची फाळणी पूर्णपणें तडीस नेली आहे. हिंदु व पाकिस्तान ह्यांतील फारकत आतां पूर्णत्वास गेली आहे. हिंद–पाकिस्तानाचे राजकीय संबंध फारसे मित्रत्वाचे नाहींतच. त्यांतच ह्या नव्या संघर्षाची भर पडली आहे. दोन्ही देशांच्या व्यापारावर त्यानें अखेर चांगला परिणाम होण्याजोगा नाहीं.

पाकिस्तानच्या धोरणावर लिहितांना "एकॉनॉमिस्ट" हें ब्रिटिश साप्ताहिक म्हणतें, " पौंडाची किंमत उतरविल्याची बातमी पाकिस्तानला कळविण्यास थोडा उशीर झाला, ही गोष्ट त्याला अपमानास्पद वाटली असावी. पाकिस्तान परराष्ट्रीय व्यापारांत डॉलर्स कमाऊं शकतो हेंहि खरें आहे. भारतानें पौंडाबरोबर रुपयाची किंमत कमी केली, तेव्हां भारतापेक्षा आपण श्रेष्ठ आहों असें दाखविण्याची संधीहि त्याला आकर्षक वाटली असेल. हिंदी रुपयाची किंमत १ शिलिंग, ६ पेन्स, तर पाकिस्तानी रुपयाची २ शिलिंग; २ पेन्स म्हणजे हिंदी रुपयापेक्षा ४४% अधिक राहील. ही परिस्थिती दीर्घ काळ टिकण्याजोगी नाहीं. पाकिस्तान व हिंदुस्थान ह्यांचेंतील कराराप्रमाणें, दोन्ही देशांचीं चलनें एकाच पातळीवर रहावीं असें ठरलें होतें."

### अमेरिकेचा आत्मविश्वास

पौंड गटांतील देशांनीं आपल्या चलनाची किंमत उतरविली, त्यामुळें त्यांची डॉलर गटांतील देशांकडे निर्गत व्यापार वाढेल अशी सर्वसाधारण अपेक्षा आहे. परंतु, ज्या प्रमाणांत ही आशा व्यक्त करण्यांत येते, त्या प्रमाणांत अमेरिकन कारखानदारांस मात्र मुळींच भिती वाटत नाहीं, हें लक्षांत घेण्याजोगें आहे. पौंडाच्या व इतर चलनांच्या घसरगुंडीमुळें अमेरिकन कारखानदार घाबरून गेलेले नाहींत; ही घसरगुंडी क्रमप्राप्तच असून दीर्घकालीन दृष्टीनें सर्वांना श्रेयस्करच ठरेल असें त्यांचें मत आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारांतील अडचणी दूर झाल्या, तर त्याचा सर्वांनाच फायदा मिळेल. ब्रिटिश माल इतर देशांच्या बाजारपेठांतून स्वस्त झाला, तरी अमेरिकन मालाप्रमाणें तो तात्काळ गिऱ्हाइकांस उपलब्ध होऊं शकणार नाहीं, हें अमेरिकन कारखानदारांना पक्कें माहीत आहे. येत्या सहा महिन्यांत तरी अमेरिकन मालाची निर्गत फारशी घटणार नाहीं व अमेरिकेंत परदेशी मालाची आयातहि पण वाढणार नाहीं, असा अमेरिकन सरकारच्या व्यापार खात्याच्या अधिकाऱ्यांचा अभिप्राय आहे. ब्रिटिश व इतर देशांची उत्पादनशक्ति ही

कांहीं एकदम वाढूं शकत नाहीं आणि आंतरराष्ट्रीय व्यापार खुला होण्यास अद्याप बराच अवकाश आहे. युरोप, द. अमेरिका, त्याच प्रमाणें जगांतील इतर कित्येक देशांनीं आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रणें बसविलेलीं आहेत तीं उठवणें आवश्यक आहे. इंग्लंड व इतर देश अमेरिकन मालाशीं स्पर्धा करूं शकण्याइतका स्वस्त व पुरेसा माल तयार करण्यावरच सर्व कांहीं अवलंबून आहे. चैनीच्या अमेरिकन जिनसांच्या निर्गतीवर मात्र प्रतिकूल परिणाम होण्याजोगा आहे.

### क्रिप्स ह्यांची समर्थनीय कोलांटी उडी

पौंडाची पराराष्ट्रांतील किंमत कमी केली जाणार नाहीं, असें अनेकवार आग्रहानें सांगणाऱ्या क्रिप्सनीं पौंडाची घसरगुंडी एकाएकी जाहीर केली, ह्याविषयीं पुष्कळांना आश्चर्य वाटलें. एखादा व्यापारी 'लवकरच किंमती उतरणार आहेत,' असें आपल्या गिऱ्हाइकांना कधीं तरी सांगतो काय ? परंतु, व्यापाऱ्याचा व्यवहार देशभर किंवा जगभर जाहीर होत नाहीं. क्रिप्सनीं, 'पौंडाची किंमत उतरणार' ह्या बातमीस थोडी जर का पुष्टी दिली असती तर परदेशांतील सर्व व्यापाऱ्यांनीं व बँकांनीं पौंड हातावेगळे केले असते आणि इंग्लंडचें देणें देण्याचें पुढें ढकललें असतें. डॉलर मिळण्याचें अजिबात थांबलें असतें आणि पौंडाची किंमत कमी करणें कांहीं टळलें नसतेंच. थोडक्यांत म्हणजे, क्रिप्सची भूमिका अर्थमंत्र्यांच्या जबाबदारीस धरूनच होती; त्यांना त्यांत कमीपणा कांहींहि नाहीं.

---

### किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि., पुणें ५

वरील कंपनीच्या फॅक्टरीचें उद्घाटन २५ एप्रिल १९४९ रोजी उद्योगमंत्री डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी ह्यांच्या हस्तें झालें. आतां कारखान्यांत वक्तशीर उत्पादनास प्रारंभ झाला असून तयार होणाऱ्या इंजनांचा दर्जा परदेशांतून येणाऱ्या इंजनांच्या तोडीचाच केवळ नव्हे, तर त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे, असा अनुभव आहे. बाजारांत इंजनांना मागणीहि पण चांगली आहे. अहवालाचे वर्षांत ( ३० मार्च, १९४९ अखेर ) त्याचें प्रतिबिंब हिशोबाच्या पत्रकांत आढळून येणार नाहीं, हें उघडच आहे. अहवालाचे वर्षअखेरपर्यंत कारखाना सुरू झाला नव्हता, म्हणून मॅनेजिंग एजंटस, मेसर्स किर्लोस्कर सन्स आणि कं., नीं मासिक १,५०० रु. अलावन्स न घेण्याचें ठरवलें, ह्याबद्दल डायरेक्टरांनीं भागीदारांचे वतीनें त्यांचे आभार मानले आहेत.

---

### सहकारी चर्चा मंडळाचा वाढदिवस

एक वर्षापूर्वी पुणें येथें स्थापन झालेल्या सहकारी चर्चा मंडळाचा पहिला वाढदिवस पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत गुरुवार, ता. २९ सप्टेंबर रोजीं सायंकाळीं ७-१५ वाजतां साजरा होणार आहे. अध्यक्षस्थानीं मुंबई प्रांताचे अर्थमंत्रि, श्री. वैकुंठराय मेहता, हे आहेत.

---

### पुणें सें. को. बँकेचे नवे चेअरमन

पुणें सें. को. बँकेची वार्षिक निवडणूक रविवार, ता. २५ रोजीं झाली. त्यावेळीं, गेल्या वर्षात ज्यांनीं व्यक्तिशः भागीदारांचे प्रतिनिधी म्हणून काम केलें, ते सर्व पुनः निवडून आले. श्री. ग. र. तुळशीबागवाले ह्यांची बोर्डाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. बारामतीचे श्री. वदक हे उपाध्यक्ष म्हणून निवडून आले. पुणें विद्यापीठास २ हजार रु. देणगी देण्याचा ठराव सभेनें संमत केला.

## नियुक्त अर्थव्यवस्था : अमेरिकन एंजिनिअरचे विचार

इंडिअन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स ह्या संस्थेपुढें, दिल्ली येथें डॉ. सॉलोमन ट्रोन ह्या अमेरिकन एंजिनिअरांचें एक व्याख्यान झालें. हिंदमधील सध्याच्या आर्थिक परिस्थितींत उत्पादन वाढविण्याचा एकमेव उपाय सर्वच सुचवीत आहेत. उलट पक्षीं उत्पादनांतील एक महत्त्वाचा घटक जो कामगार वर्ग, त्याच्याकडून मिळावें तसें सहकार्य मिळत नाहीं अशी तक्रार मालकवर्गाकडून करण्यांत येत आहे. उत्पादनाच्या साधनांवरील खाजगी मालकी नष्ट केल्या गेलेल्या रशियासारख्या देशांतील अनुभव डॉ. ट्रोन ह्यांनीं आपल्या व्याख्यानांत सांगितले. त्याचा आशय असा:— रशिआंतील दर कामगारामागें होणारें उत्पादन पुढारलेल्या इतर देशांपेक्षां कमी आहे. परंतु गेल्या २० वर्षांत रशिआंतील कामगारांनीं केलेली प्रगति इतक्या अल्पावधींत इतरत्र कोठेंही झालेली नाहीं. रशिआंतील अर्थव्यवस्थेचीं चार विशेष लक्षणें आहेत. (१) रशिआंतील प्रत्येक कामगाराला आपलें कसब वाढविण्याची पूर्ण संधि मिळते व त्याला आपल्या व्यवसायांत आपल्या मगदुराप्रमाणें वाटेल तितके वर जातां येतें. (२) आपण केलेल्या श्रमाचा पूर्ण फायदा आपणांस मिळेल अशी रशिअन कामगाराची खात्री झालेली आहे. (३) रशिअन कामगाराला तो वापरीत असलेल्या यांत्रिक हत्यारांची चांगली माहिती असते, आणि (४) तेथील अर्थव्यवस्थेच्या आंखणींत तेथील जनतेनें सक्रिय भाग घेतलेला होता.

आर्थिक नियोजनासंबंधीं बोलतांना डॉ. ट्रोन म्हणाले कीं, उद्दिष्ट ठरल्याशिवाय नियोजनाला कांहीं अर्थ नाहीं. आर्थिक नियोजन करणाऱ्यांचें ध्येय स्पष्ट असलें पाहिजे. त्याचप्रमाणें, त्यांनीं लोकांकरितांच नव्हे तर लोकांच्या सहकार्यानें योजना आंखल्या पाहिजेत. आर्थिक योजना ह्या नेहमींच अपरिवर्तनीय नसतात. परिस्थिति-प्राप्त दुरुस्त्या नियोजकांना कराव्या लागतात. रशिआचेंच उदाहरण घेतलें तर असें दिसतें कीं, त्या राष्ट्राची तिसरी पंचवार्षिक योजना मूळ ठरल्याप्रमाणें पार पाडतां आलेली नाहीं. युद्धाचा संभव आणि प्रत्यक्ष युद्ध ह्या कारणांमुळें मूळच्या आराखड्यांत रशिआला बदल करावा लागला.

डॉ. ट्रोन रशिआच्या पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांचे सल्लागार होते. सध्या भारत सरकारनें त्यांना देशांतील पुनर्घटनेच्या योजनांचा समन्वय साधण्यासाठीं मुद्दाम बोलावलें आहे. भारतांतील खाजगी उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण निदान १० वर्षें तरी अधिकृत रीत्या लांबणीवर टाकण्यांत आलेलें आहे. अशा परिस्थितींत डॉ. ट्रोन ह्यांचा सल्ला प्रत्यक्षांत उतरविणें अशक्यच न मानलें तरी कठीण आहे. तथापि, भारताची अर्थव्यवस्था उत्पादनक्षमतेच्या दृष्टीनें वरच्या टप्प्याला नेण्यास डॉ. ट्रोन ह्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा हिंदी उद्योगपतींनीं घ्यावयास पाहिजे ह्यांत मात्र शंका नाहीं.

---

**सीलोनचे प्रवाशांपासून उत्पन्न**—सीलोनला परकीय प्रवाशांपासून २५,५०,००० रुपयांचें उत्पन्न ह्या वर्षीच्या पहिल्या सहा महिन्यांत झालें. परकीय प्रवाशांना विकलेल्या वस्तूंमुळें १,३८,६०० पौंड, ६९,७०० डॉलर्स, १९,१०० मलायाचे डॉलर्स, २,१२,७०० रुपये (पाकिस्तानचे व हिंदुस्थानचे मिळून), ८०० ऑस्ट्रेलिअन पौंड आणि १,१०९ पूर्व आफ्रिकेचे शिलिंग, अशी प्राप्ती झाली.

वाचकांचा पत्रव्यवहार

### सरकारी घोषणा व इरिगेशन खात्याचे नियम

सा. न. वि. वि. " अधिक अन्नधान्यें, चारा, फळें, फळफळ व खाद्य वस्तू पिकवा " ' जास्तींत जास्त जमीन लागवडीखाली आणा, एक इंचही जमीन नापेर ठेवूं नका ' अशा विनंत्या-घोषणा पंतप्रधानापासोन पाटीलतलाट्यापर्यंत सर्व अधिकारी करीत असतात, परंतु चालू असलेल्या इरिगेशन खात्याच्या जाचक व अडवणुकीचे नियमामुळें सरकारी धोरणाचें विपरीत परिणाम होत आहेत. " लिफ्ट इरिगेशनवरील पिके व कॅनाल इरिगेशन वरील पिकें यांत कमीत कमी पन्नास फूट अंतर सोडावें असा इरिगेशनचा नियम आहे. असाच नियम विहिरीवरील पिकें व कॅनालवरील पिकें याबाबत होता, व तो नुकताच बदलून " पन्नास फुटांऐवजीं दहा फुट अंतर चालेल असा झाल्याचें समजतें; परंतु तीच सवलत लिफ्ट इरिगेशनचे बाबतींत देणेस इरिगेशन खातें तयार नाहीं. पन्नास फूट अंतर सोडल्यानें किती तरी उत्तम जमीन नापेर रहाते व अधिक जमीन पिकविणेस कसा विरोध होतो, हें इरिगेशन खात्याचे ध्यानांत येईल काय ?

कॅनलचे पिकांतून लिफ्टचीं व विहिरीचीं पिकें यांत चोरून पाणी घेतलें जातें म्हणून नियम केले आहेत, असें सांगितलें जातें परंतु यावर खरा उपाय निर्मीड व प्रामाणिक तपासणी अधिकारी हा आहे, जमिनी नापेर पाडणेस भाग पाडणें हा नव्हे.

ही अशक्यप्राय अट पाळणें टाळावें, व खालचे नोकरांनीं वर रिपोर्ट अगर पंचनामे करूं नयेत याकरितां खालच्या अधिकाऱ्यास लांच देणें व ती कनिष्ठ नोकरांनीं घेणें या गोष्टीला असल्या विचित्र नियमांनीं प्रोत्साहन मिळतें. हा अंतराबद्दलचा नियम रद्द करणेची निदान लिफ्ट इरिगेशनचे पिकाबाबतही दहा-फुटांची सवलत देणेची तरतूद वरिष्ठ अधिकारी करतील काय ?

के. न. गोखले

बारामती एक बागाईतदार.

## सावकारी कायद्यांत वैयक्तिक तारणावरील कर्जाचा समावेश होतो

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

जव्हेरीलाल मगनलाल ह्यांनीं लायसेन्स न घेतां व कायद्याप्रमाणें हिशेब न ठेवतां सावकारी धंदा केला म्हणून त्यांचेवर खटला भरण्यांत आला. "सावकारी कायदा फक्त विना-तारण कर्जास लागू आहे आणि मी तारणावरच फक्त कर्जे देतों" असा आरोपीचा बचाव होता. सावकारी कायद्यांत तारणावरील व विना-तारण, दोन्ही कर्जांचा अंतर्भाव होतो, असें मुंबई हायकोर्टानें ठरवून आरोपीचें म्हणणें अग्राह्य ठरविलें.

### कामगारांना विश्वासांत घेण्याचा उपक्रम

कनसॉलिडेटेड एडिसन कंपनी ऑफ न्यूयॉर्क सिटीनें आपल्या ३०,००० कामगारांच्याकडे पोस्टानें कंपनीची १९४८ सालाची सचित्र माहिती पाठविली आहे. ह्या २१ पानी पुस्तिकेंत कंपनीचा कारभार सोप्या शब्दांत समजावून सांगण्यांत आला आहे. कामगारांच्यासाठीं कंपनीनें काय काय केलें, हें त्यांत वर्णिलें आहे. ज्यांनीं विशेष अडचणीचे वेळीं जास्त तास काम केलें, त्यांचे आभार मानण्यांत आले आहेत. कंपनीकडे दीर्घकाळ कामावर असणारांचे फोटो छापले आहेत. १५ वर्षांपेक्षां दीर्घकाळ कंपनीचें काम केलेल्या कामगारांची संख्या २२,१०७ आहे आणि सात कामगार ४७ वर्षे कामावर आहेत.

कंपनीचे अध्यक्ष म्हणाले:—

### हिंदी दर-माणशीं उत्पादन सर्वांत कमी

" चांगली मजुरी आणि सुखी कामगार ह्यांच्या श्रेयस्करपणावर माझा पूर्ण विश्वास आहे. इतर देशांत आर्थिक प्रगति व मजुरींत वाढ हीं एकत्र आढळतात, परंतु दर माणशीं उत्पादन मोठें झाल्यानेंच कामगारांची मजुरी तेथें वाढूं शकली, हें मात्र हिंदुस्थानांत कोणी लक्षांत घेत नाहीं. हवामान, आरोग्य, अनुभवाचा अभाव, इत्यादि गोष्टींमुळें उत्पादन शक्तीवर प्रतिकूल परिणाम होतो, तो विचारांत घेतला तरी हिंदुस्थानांतील दर माणशी उत्पादन सर्व जगांत कमी दर्जाचें भरेल हें वादातीत आहे. कौशल्याची आवश्यकता नसणाऱ्या जागीं फार माणसें नेमून कामें करवून घेतलीं जातात, त्याचा हा परिणाम आहे. हिंदुस्थानांत मजुरींचे दर कमी होते, तेव्हां दर नगी मजुरीचा खर्चहि कमी येई आणि त्यामुळें त्याचे औद्योगिक दुष्परिणाम तेव्हां जाणवले नाहींत. युद्धकाळांत आणि त्यानंतर मजुरींचे दर झपाट्यानें वाढले आहेत, परंतु त्या प्रमाणांत दर माणशीं उत्पादन कांहीं वाढलेलें नाहीं. उलट, एकूण उत्पादनाच्या मानानें मजुरांची संख्या ज्यास्तच होऊन दर माणशीं उत्पादन घटलें आहे. त्यामुळें, दर नगी मजुरीचा खर्च फारच वाढला आहे."

जे. आर. डी. टाटा
एअर इंडिया लि.


सटाणा को-ऑपरेटिव्ह परचेस सेल युनिअन लि.
ता. बागलाण, जिल्हा नाशीक

नोटीस

युनिअनची वार्षिक साधारण सभा शुक्रवार ता. ३०।९।१९४९ रोजीं दुपारीं २ वाजतां ऑफिसांत पोटनियम नंबर २१ प्रमाणें विषयांचा विचार करण्यासाठीं भरणार आहे तरी सर्व वैय्यक्तिक व सोसायट्यांचे अधिकृत प्रतिनिधींनीं हजर रहावें ही विनंति.

दगाजी अजबा पाटील
मॅनेजिंग डायरेक्टर,
सटाणा को. ऑ. परचेस सेल युनिअन लि.

बेडेकर लोणचीं

≡ पहिल्या मूल्यमापनांत नफा वाटणारी ≡
महाराष्ट्राची आदर्श कंपनी
सेंट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.
लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.
आकर्षक अटीवर मेहनती व विश्वासू प्रतिनिधी सर्वत्र नेमणें आहेत.
शं. न. आगाशे.
मॅनेजिंग डायरेक्टर.

## सोलापूर डि. सें. को. बँकेची अक्कलकोट शाखा

### अक्कलकोटच्या राणीसाहेबांचे हस्तें उद्‌घाटन

गुरुवार ता. १५ सप्टेंबर रोजीं वरील समारंभ अत्यंत थाटानें साजरा झाला. त्यावेळीं बँकेचे चेअरमन, श्री. एच. व्ही. केळकर, बी. ए., एलूएल. बी., ह्यांनीं सर्वांचें स्वागत करून बँकेच्या प्रगतीचा वृत्तांत निवेदन केला. तिची स्थापना १९१८ मध्यें झाली. बँकेच्या हल्लीच्या संचालक मंडळावर गेलीं सुमारें २४ वर्षे असलेले श्री. गणपतराव धोंडिबा साठे व रावसाहेब गणपतराव एकनाथ पाटील हे जिल्हा स. ऑ. ऑर्गेनायझर्स आहेत. त्यांच्या कामगिरीचा श्री. केळकर ह्यांनीं गौरवपूर्वक उल्लेख केला. जिल्ह्यांतील ६३० सहकारी पतपेढ्यांपैकी ३७७ पतपेढ्या ह्या बँकेस जोडलेल्या आहेत. बँकेचें खेळतें भांडवल ६६ लक्ष रु. आहे. बँकेच्या सोलापूर हेड ऑफिसच्या स्वतःच्या सुंदर इमारतीवर तिसरा मजला लवकरच होणार आहे. आतांच्या अक्कलकोट तालुक्याच्या सोईसाठी अक्कलकोट येथें शाखा उघडण्यांत येत आहे.

श्री. स. सौ. सं. निर्मलादेवी, राणीसाहेब महाराज, अक्कलकोट ह्यांनीं आपल्या भाषणांत सहकारी चळवळीचें महत्त्व प्रतिपादन करून सोलापूर जिल्हा बँकेच्या प्रगतीबद्दल तिचें अभिनंदन केलें. चेअरमन, श्री. केळकर, ह्यांच्या बँकेच्या मार्गदर्शनाबद्दलहि राणीसाहेबांनीं त्यांना धन्यवाद देऊन अक्कलकोट शाखेचें उद्‌घाटन जाहीर केलें.

३० जून, १९४९ अखेर संपलेल्या वर्षी बँकेनें आपली प्रगति कायम ठेवली आहे. लँड–मॉर्गेज खातें चालू केलें आहे. सोलापूर येथें सेफ् डिपॉझिट लॉकर कॅबिनेट भाड्यानें देण्यास प्रारंभ केला आहे. जिल्ह्यांतील सहकारी संस्थांचे उत्तेजनार्थ श्री. आर. एम. पाटील ( बाळेकर ) ह्यांनीं बाळेकर फिरती ढाल ठेवली आहे. बँकेस ३३,४३० रु. नफा झाला. ५% डिव्हिडंडला ९,००० रु. लागले. ( चेअरमन : श्री. एच. व्ही. केळकर, बी. ए., एलएल. बी., मॅनेजर : श्री. जे. के. जोशी, बी. ए. )

---

### अर्बन को. बँक लि., सांगली

वरील बँकेचें वसूल भांडवल आतां १,०८,४३० रु. झालें असून रिझर्व्ह व इतर फंडांत ६९,६४७ रु. आहेत. ठेवींत मागील वर्षी थोडी घट झाली होती, ती भरून निघून १९४६–४७ मधील ठेवींपेक्षाहि आतां ठेवी पावणेदोन लाखांनीं ज्यास्त आहेत. खेळतें भांडवल १५ लक्ष रुपयांवर गेलें आहे. निव्वळ नफा २४,००० रु. झाला आहे. ६¼% डिव्हिडंडला ७,४१७ रु. लागले. ( चेअरमन: ग. कों. गोडबोले, बी. ए. एलएल. बी., व्यवस्थापक : श्री. ल. य. लागू, बी. ए., एलएल. बी. )

---

### श्री लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर

ह्या बँकेचें शेअर भांडवल ४०,८९० रु. झालें आहे. रिझर्व्ह व इतर फंड यांत भर पडून खेळतें भांडवल ३,२२,४०२ रु. झालें आहे. कापड वांटपाचें दुकान बँकेनें यशस्वी रीतीनें चालवून त्यांत २,५६८ रु. नफा मिळविला. बँकेच्या नेहमीच्या व्यवहारांत ३,४२१ रु. नफा झाला, म्हणजे एकूण नफा ५,९८९ रु. झाला. ५% डिव्हिडंड देण्यांत आलें. बँकेनें नवीं कर्जे देण्याच्या बाबतींत विशेष दक्षता घेतली आहे. ( प्रेसिडेंटः श्री. प. रे. कोसंदर; मॅनेजरः श्री. एन. डी. डंके. )

---

### दि इसलामपूर को. पीपल्स बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल ३२५ रु. नीं वाढून तें ३०,५९० रु. झालें आहे. ठेवींत वाढ होऊन खेळतें भांडवलहि आतां १,९०,९७० रु. झालें आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें भाड्याचे करारानें जागा घेतली आहे. तिचेवर बँकेची स्वतःची इमारत बांधण्यांत येणार आहे. इमारतींत सेफ कस्टडीचीहि सोय करण्यांत येणार आहे. दोन वर्षांनीं बँकेचा रौप्यमहोत्सव साजरा होईल, तेव्हां बँकेच्या स्वतःच्या इमारतीचें औचित्य विशेष आहे. रेशन कापड दुकानांत बँकेस अवघ्या ६ महिन्यांत १,१७३ रु. नफा मिळाला. नेहमीच्या व्यवहारांतील नफा १,६८३ रु. आहे भागीदारांस ५% डिव्हिडंडसाठी १,५३० रु. लागले. ( चेअरमनः श्री. एम. डी. पवार, मॅनेजरः श्री. डी. डी. लाटकर. )

---

### दि बेळगांव पायोनियर अर्बन को. क्रे. बँक लि.

२,८९,९२० रु. शेअर भांडवल, २,०७,४०९ रु. रिझर्व्ह फंड, १,२८,९३३ रु. इतर फंडस, २०,०७,६७० रु. ठेवी, १,१३,३०४ रु. रोख शिल्लक, ५,५१,४९४ रु. इतर बँकांत शिल्लक, ६,९४,७१३ रु. इनव्हेस्टमेंट, ११,३९,९४९ रु. कर्जे, हे ताळेबंदांतील आकडे बेळगांव पा. अ. बँकेची सुस्थिति दर्शविण्यास पुरेसे आहेत. २७½ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलांत ६½ लक्ष रु. बँकेचे स्वतःचे आहेत. इनव्हेस्टमेंटची बाजारभावानें किंमत ताळेबंदांतील किंमतीपेक्षा ज्यास्त आहे. बँकेची धान्य व कापड रेशन दुकानें व्यवस्थितपणें व काटकसरीनें चालू आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस ३७,५३४ रु. नफा झाला. ( चेअरमनः श्री. बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल बी., मॅनेजरः श्री. पी. जी. कामत, बी. कॉम्. )

---

### दि कॉसमॉस को. अर्बन बँक लि., पुणें.

दी कॉसमॉस को. ऑ. अर्बन बँक लि. पुणें २ च्या दि. ११ सप्टेंबर १९४९ ला झालेल्या वार्षिक निवडणुकींत पुढील प्रमाणें अधिकारी मंडळें १९४९–५० सालाकरतां निवडून आलीं.

सल्लागार मंडळः–( १ ) श्री. ना. वि. पांडव, अध्यक्ष ( २ ) श्री. ग. न. जेजुरीकर, उपाध्यक्ष ( ३ ) श्री. रा. घ. भणगे. ( ४ ) श्री. श्री. अ. कानगो व ( ५ ) श्री. मो. गो. करमरकर.

कार्यकारी मंडळः–( १ ) श्री. गो. श. देशमुख, कार्याध्यक्ष. ( २ ) श्री. वि. ना. दात्ये, उपकार्याध्यक्ष. ( ३ ) श्री. चिं. वा. भट. ( ४ ) श्री. शं. ल. ओगले. ( ५ ) श्री. यं. बा. देहाडराय. ( ६ ) श्री. बा. वि. कुंभारे. ( ७ ) श्री. ज. द. वैद्य. ( ८ ) श्री. पां. रा. देव. ( ९ ) श्री. वि. ल. हर्डीकर. ( १० ) श्री. वा. म. लेले व ( ११ ) श्री. द. ल. पारसी.

आयव्यय निरीक्षकः–( १ ) श्री. म. रा. जोशी व ( २ ) रा. पु. वा. सुभेदार.

---

### दि पूना अर्बन को. बँक लि., पुणें

ह्या संस्थेची पंचविसावी वार्षिक साधारण सभा रविवार ता. १८ सप्टेंबर १९४९ रोजीं झाली. सदर सभेंत झालेल्या निवडणुकी खालीलप्रमाणें.

कार्यकारी मंडळ

श्री. दिगंबर विष्णु इनामदार, चेअरमन. दिनकर शंकर जोशी, नरहर भाऊराव कुलकर्णी, व्यंकटेश नागेश पोळ, रणछोड पांडुरंग भोंडे, यशवंत बाबुराव जेधे, महादेव भाऊराव शेळके, देविदास त्रिंबक विसाळ, रघुनाथ भाऊशेट शिवरकर.

हिशेबतपासनीस

१ श्री. शरदचंद्र सिताराम मरकळे २ लक्ष्मण धर्माजी ढुंबरे.

## व्यापारांतील खांचा खळगे.

### (२)

लेः— ना. अ. तेंडोलकर,

मॅ. डायरेक्टर, दि हिंद एजन्सीज लि. कोल्हापूर.

**भांडवल उभारणी**

धंद्यामध्यें इतर सर्व गोष्टीपेक्षां अत्यंत अवघड गोष्ट कोणती असेल तर ती भांडवल उभारणी ही होय. ज्याला ही गोष्ट साधली त्यास इतर अवधानें नसलीं तरीहि तो यशस्वी व्यापार उद्योगधंदा करूं शकेल; पण इतर गोष्टी आहेत आणि भांडवल नाहीं त्यास मात्र यश कितपत मिळेल हें सांगतां येणार नाहीं. भांडवल उभारणीसाठीं दुसऱ्यास विश्वासांत घेऊन आपलें म्हणणें पटवून देण्याची जितकी आवश्यकता आहे तितकीच त्यासाठी निरनिराळ्या मार्गांनीं त्याजवर वजन आणण्याचीहि आहे. योग्य तितक्या भांडवलाची उभारणी करतां येत नाहीं म्हणून कितीतरी किफायतशीर योजना वाया गेल्याचें आपल्या नजरेस येतें. भांडवलाची उभारणी सर्वसाधारणपणें चार प्रकारें होत असल्याचें आपल्या नजरेस येतें:—

वैयक्तिक भांडवल उभारणी,

भागीदारी,

जॉइंट स्टॉक लिमिटेड कंपन्या व

खाजगी भागीदारीच्या (लिमिटेड) कंपन्या.

यांपैकीं ज्यास जसे जमेल तशा प्रकारें तो भांडवल उभारणी करीत असतो. भांडवल कशाहि प्रकारें जमा होवो पण आपल्या **धंद्याच्या मानानें आवश्यक तितकें भांडवल सुरवातीस गोळा करणें अत्यंत आवश्यक असतें;** कारण धंदा सुरू झाल्यावर तें गोळा करण्यास आवश्यक असणारी सवडहि असत नाहीं व मग भांडवल देणारे धंदा कशाप्रकारें नफ्या तोट्यांत चालला आहे याचा बारकाईनें विचार करूनच भांडवल देत असतात. सुरवातीस जे भांडवलदार अत्यंत उत्साहानें भांडवल देण्यास पुढें येतात तेच भांडवलदार, आप्त किंवा मित्रमंडळी व्यापार थोडासा जरी नुकसानीचा आढळला तरी एकदम हात आखडतां घेतात व अशाप्रकारें धंदास एकदम पायबंद बसतो. व्यापाराचें स्वरूप एकाद्या राजप्रासादासारखें आहे. एकाद्या राजप्रसादाच्या पायासच पंचवीस हजार रुपये लागले व तो पुढें कांहीं अडचणीमुळें पुरा करतां आला नाहीं, तर पायासाठी खर्च केलेली रक्कम जशी मातीमोल होते त्याप्रमाणेंच व्यापाराचेंहि आहे. नुकसान आलें म्हणून हात आखडता घेतला तर खर्च केलेली सर्व रक्कम मातीमोल होईल. परंतु अनुभवानें शहाणे होऊन धीर न सोडतां टीकाव धरला तर त्यांत यश हें ठेवलेलेंच ! कारण "जेथें हारवलें असेल तेथें सांपडेल" या न्यायानें ज्यांत नुकसानी आली असेल त्याचा पाठपुरावा केला तर हटकून फायदाच होईल. पण इकडे अनुभव मात्र ठरल्याप्रमाणें उलटा येतो. ९५ टक्के भांडवलवाले हात आखडता घेतील व उरल्या पांचाबद्दल हमखास सांगतां येत नाहीं. हिंदी भांडवल लाजाळू आहे म्हणतात, तें यामुळेंच होय.

**उमेदवारीची आवश्यकता**

मनुष्याचें सर्वसामान्य ज्ञान, किंवा त्याचा पुस्तकी व्यासंग कितीही असो, धंद्यांत यश येण्यासाठीं म्हणून त्यांतील उमेदवारीची आवश्यकता ही आहेच. अशी उमेदवारी केल्यासेरीज, म्हणून, मनुष्य स्वभावाचें खरेखुरें ज्ञान होत नाहीं. कोणताहि धंदा असो अथवा व्यापार असो आपला नेहमीं संबंध येणार मनुष्याशींच ! मनुष्यस्वभावाची पारख असणें व स्वतः नुकसानींत न येणें यासच व्यवहारचातुर्य असें म्हणतात. याचा अर्थ दुसऱ्यास चकविणें असा नसून दुसऱ्याकडून न फसलें जाणें असा आहे. वयाच्या ६०–६५ वर्षेपर्यंत ज्यांनीं उत्कृष्ट व्यापारी म्हणून नांवलौकिक मिळविला अशा मोठमोठ्या व्यापाऱ्यांची दिवाळी वाजल्याचें किंवा ते संकटांत आल्याचेंहि अनेक वेळां आपल्या नजरेस येते. याचें कारण असें होतें कीं, मनुष्य एकाद्या गोष्टीमागें किंवा व्यापामागें इतका लागतो व त्यानें तो भारून जातो कीं त्यास प्राथमिक गोष्टींची चौकशी करण्याचें भानही राहात नाहीं व अनेक वेळां भारावलेल्या स्थितींतच त्याचें दिवाळें वाजतें. मग तो शुद्धीवर येतो. पण याचा उपयोग बैल गेला व झोपा केला, ह्या म्हणी इतकाच होतो.

ज्या लोकांचा लहानपणापासूनच व्यापारव्यवसायाशीं संबंध आलेला असतो, म्हणजेच ज्यांना परंपरेनें शिक्षण मिळतें त्यांना यासंबंधीचें आवश्यक तें ज्ञान परंपरेनें व अनुभवानें आलेलें असतें. परंतु एकादा नवखा इसम जेव्हां व्यापारांत पडतो तेव्हां सर्वच गोष्टी त्याला पैसे देवून शिकाव्या लागतात. कोणत्या मालास किती मागणी आहे, कोणता माल कोठें किफायतशीर विकत मिळतो, हंगामी धंदे कोणते, कायम चालणारे कोणते, कोणत्या मालांत किती रक्कम गुंतवावी, उधारीनें धंदा करावा किंवा करूं नये, करावयाचा झाल्यास कोणत्या खबरदारी घ्याव्यात व कोणाशीं करावा, नौकर लोकांपासून कसें सावध रहावें, वगैरे गोष्टी पुस्तकांतुन शिकण्यासारख्या नाहींत; तर यासाठीं प्रत्यक्ष उमेदवारी केली पाहिजे. असें न करतो जे एकदम धंद्यास सुरवात करतात त्यांना पहिल्या चार–सहा महिन्यानंतरच असें आढळतें कीं, आपल्या गळयांत न खपणारा माल भरमसाट किंमतीला बांधला गेला आहे, उधारी बाक्या वाढल्या आहेत, खपणारा माल खरेदी करण्यासाठी आपणापाशीं भांडवल नाहीं आणि नोकरांनीं आपणांस लुबाडलें आहे. हा सर्व अनुभव स्वखर्चानें शिकण्याचें फारच थोड्यांना परवडेल. (अपूर्ण)

---

**कोणत्या देशांतून माल आणण्यासाठीं हुंडणावळ अवघड ?**

मालाच्या आयातीचे दृष्टीनें जे देश हुंडणावळीस कठीण आहेत, अशांची यादी हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केली आहे. ती हिंद–ब्रिटन आर्थिक करारांतील अटींवर आधारलेली आहे.

**डॉलर गट**

अमेरिका व तिच्या सार्वभौमत्वाखालील प्रदेश, कॅनडा (न्युफौंडलंडसह), फिलिपाईन बेटें, बोलेव्हिया, कोलंबिया, कोस्टारिका, क्युबा, डोमिनिकन रिपब्लिक, इक्वेडॉर, ग्वाटेमाला, हायटी, होंडूरास, मेक्सिको, निकारॅग्वे, पनामा, सॅल्व्हेडॉर, व्हेनेझुएला.

**दुष्प्राप्य हुंडणावळीचे इतर प्रदेश**

अर्जेंटिना, पॅरेग्वे, बेल्जम व त्याच्या सार्वभौमत्वाखालील प्रदेश, स्वित्झरलंड, पश्चिम जर्मनी (अमेरिका–ब्रिटिश–फ्रेंच भाग)

---

**पाकिस्तानमधील बार्लीचें पीक**—पाकिस्तानांत यंदा बार्लीचें पीक १,७९,००० टन होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. गेल्या वर्षी १,३४,००० टन बार्ली झाली होती. आंकडेवारीप्रमाणें पिकांत झालेली ही वाढ २३ टक्के आहे. बार्लीच्या लागवडीखालीं असलेल्या जमीनींतही यंदा वाढ झाली आहे. ह्या वर्षी एकूण ६,११,००० एकर जमिनींत बार्ली लावण्यांत आली आहे.

खून साफ करनेमें मशहूर
डॉ. वामन गोपाल का सार्सापरिला

**धी कोपरगांव पीपल्स को. ऑ. बँक लि.**

कोपरगांव, जि. अहमदनगर.
( उद्घाटन समारंभ : ता. १७-१-१९४९ )

कोपरगांव येथील अत्यंत प्रतिष्ठित नागरिक यांचे देखरेखीखालीं स्थापित झालेली आणि आधुनिक पद्धतीवर बँकिंगचे सर्व व्यवहार करणारी

**स्थानिक सहकारी बँक**

सुरुवातीचें शेअर भांडवल : ६८,७५० रु.

बिलें वसुली, हुंड्या, मुंबईवरील चेक्स, ड्राफ्टस, वगैरे व्यवहार केले जातात.

आकर्षक व्याजावर मुदतीच्या ठेवी ३ महिनेपासून ५ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातील.

सेव्हिंग्ज बँकेंत रु. १०,००० पर्यंत व्याज देणेंत येतें.

**विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.**

जी. पी. ठाणेकर, बी. ए. मॅनेजर. | मोहनलाल कालिदास व्यास चेअरमन.

**दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड**

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )
पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

**भोर स्टेट बँक लि.**

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.
शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६७,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी.
श्री. बा. ग. धंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

पुणें कचेरी ५१५ बुधवार
आधिक माहितीसाठी लिहा. रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. ) मॅनेजर.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ४,३०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २ कोटींचे वर |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. धों. कृ. साठे ( चेअरमन ),
श्री. श्री. गो. मराठे ( व्हाइस चेअरमन ),
श्री. न. ग. पवार,
श्री. मा. रा. जोशी,
श्री. फ. दी. पदमजी,
श्री. मा. वि. शहा,
श्री. शं. ल. किर्लोस्कर,
श्री. भा. म. गुप्ते,
श्री. मो. रा. ढमढेरे.

★ चालू खात्यावर द. सा. द. शें. अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
★ सेव्हिंग्ज खात्यावर द. सा. द. शें. १॥ टक्का व्याज मिळतें.
★ मुदती ठेवींची रक्कम तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत स्वीकारली जाते.
★ सोलापूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था केली आहे.

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २
सी. व्ही. जोग, मॅनेजर.
( पॅरॅमाउंट लि. )

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.